# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ७१-२३** **दिनांक :- ०२/०३/२०२३**

## ५८ लाख ७४ हजार रुपये किंमतीचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या नायजेरीयन आरोपीतास अटक. तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ०१.०३.२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. बांदल यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळली की, एक नायजेरीयन इसम अंमली पदार्थ विक्री करिता नालासोपारा पुर्व, प्रगतीनगर येथील जिवदानी हॉलचे बाजुला येणार आहे. सदरबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीची शहानिशा करुन कारवाई करणेबाबत वरिष्ठांकडून आदेश प्राप्त केले.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन एक नायजेरीयन इसम प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व येथील जिवदानी हॉलचे बाजुला आला असता तो पळुन जावु लागल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकातील पथकामधील अधिकारी व अंमलदार यांनी त्याचा पाठलाग करुन त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता इदे इम्यानुवेल इदे पॉल, वय २६ वर्षे, रा. प्रगतीनगर नालासोपारा (पुर्व) असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे १०,२४,०००/- रु. किंमतीचा १०२.४०० ग्रॅम वजनाचा एम.डी. अंमली पदार्थ मिळून आला. तसेच नमूद इसमाच्या राहत्या घराची घरझडती घेतली असता त्याच्या राहत्या घरात १७,२२,५००/- रु. किंमतीचा १७१.२५० ग्रॅम वजनाचा कोकेन अंमली पदार्थ, ३१,२८,३००/- रु. किंमतीचा २२३.४५ ग्रॅम वजनाचा MDMA / ECSTASY अंमली पदार्थ मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला.

नमूद आरोपीताविरुध्द पो.उप.नि.बांदल यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणेत गु.रजि.नं. १८१/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २१ क, २२ क अन्वये दिनांक ०२.०३.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार अति. कार्यभार परिमंडळ २ वसई, श्री. डॉ. शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि. मिथुन म्हात्रे, पोउनिरी. बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पोहवा. अनिल शिंदे, आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, तडवी, पन्हाळकर, पांडुरंग केंद्रे, पो.अंम. छपरीबन, राऊत यांनी केलेली आहे.




-----oooo-----